**दिन विशेष...**

१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे सासवड येथे निधन.

१९३३ : ज्यांच्या स्मरणार्थ रणजी करंडक स्पर्धा घेतल्या जातात, असे प्रसिध्द क्रिकेटपटू रणजितसिंहजी विभासिंहजी यांचे निधन

१९७५ : कॅनडामध्ये जगात सर्वात उंचीचा ५५५.३५ टॉवर बांधून पूर्ण झाला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७१,९४७.५५ -१,६३५.६७ (२.२२%)

डॉलर ₹ ९४.६५

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २३ |
| दिल्ली | ३१ | २१ |
| मुंबई | ३४ | २५ |
| नागपूर | ३८ | २३ |
| पुणे | ३८ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार , दि. २ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४१ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

प्रेम ही भाषा जगातील प्रत्येक जीव आणि प्राणी समजू शकतो. धैर्य आणि संयम हे आपल्या आयुष्याच्या सर्वात मोठ्या शक्ती आहेत. ते आपल्याला कोणत्याही परिस्थितीत शांत आणि केंद्रित ठेवण्यास मदत करतात.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२२ संध्या-६:४२

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,०५५/- २,४५,०००/-

# इराणची मायक्रोसॉफ्ट, गुगल, मेटा, टेस्लासह १८ अमेरिकी कंपन्यांवर हल्ला करण्याची धमकी

## इराणच्या रिव्होल्यूशनरी गाड्र्सने दिलेल्या इशाऱ्याने जगभरात भरली धडकी

वृत्तसंस्था । तेहरान

**इराणने अमेरिकन टेक कंपन्यांना लक्ष्य करण्याच्या दिलेल्या धमक्यांना अमेरिकेने प्रत्युत्तर दिले आहे. इराणच्या रिव्होल्यूशनरी गाड्र्सने दिलेल्या इशाऱ्याला प्रतिसाद म्हणून व्हाईट हाऊसने हे निवेदन जारी केले आहे.**





निवेदनात इराणने दिलेल्या धमकीचा उल्लेख करण्यात आलाय. त्यात, 'जर आणखी इराणी नेत्यांची हत्या झाली, तर ते गूगल आणि मायक्रोसॉफ्टसह अमेरिकन टेक कंपन्यांना लक्ष्य करतील', असे इराणने म्हटले असल्याचे सांगण्यात येतंय.

व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'अमेरिकन सैन्य कोणत्याही इराणी हल्ल्याला रोखण्यासाठी सज्ज आहे आणि यापुढेही राहील. इराणी राजवटीकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांमध्ये झालेली ९०% घट हे स्पष्टपणे दर्शवते,'असे म्हणत इराणच्या धमकीला उत्तर दिले आहे.

**टेक कंपन्यांना लक्ष्य करण्याचा इशारा**

युद्धादरम्यान इराणने आखाती देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले केले आहेत. आता, ते अमेरिकन टेक कंपन्यांनाही लक्ष्य करण्याची तयारी करत आहे. काल इराणच्या रिव्होल्यूशनरी गाड्र्सने गूगल आणि मायक्रोसॉफ्टसह १८ अमेरिकन कंपन्यांवर हल्ले करण्याचा इशारा दिला. इराणच्या या धमकीमुळे आता कॉर्पोरेट कंपन्या असुरक्षित झाल्या आहेत.

आयआरजीसीने आपल्या निवेदनात, 'इराणमधील प्रत्येक हत्येच्या बदल्यात, ते या टेक कंपन्यांची संबंधित युनिट्स नष्ट करतील', अशी धमकी देण्यात आलीय. अधिकाऱ्यांच्या हत्यांमध्ये कथितरित्या सामील असलेल्या १८ अमेरिकन कंपन्यांच्या नावांचा त्यात समावेश होता.

आयआरजीसीने या टेक कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना, जर त्यांना आपले प्राण वाचवायचे असतील तर तात्काळ आपली कामाची ठिकाणे सोडण्याचा सल्लाही दिला आहे.

इराणच्या मते, या कंपन्या इस्रायल आणि अमेरिकेच्या लष्करी आणि गुप्तचर संस्थांना पाठिंबा देतात. इराणने आपल्या सायबर हल्ल्यांसाठी या कंपन्यांना जबाबदार धरले आहे.

**➤ ॲपल, गुगलसह १८ कंपन्यांना लक्ष्य**

आयआरजीसीने आखाती देशांमधील १८ अमेरिकन कंपन्यांना लक्ष्य करण्याचा इशारा दिला आहे. या कंपन्यांमध्ये सिस्को, एचपी, इंटेल, ओरॅकल, मायक्रोसॉफ्ट, ॲपल, गुगल, मेटा, आयबीएम, डेल, पॅलंटिर, एनव्हिडिया, जेपी मॉर्गन, टेस्ला, जनरल इलेक्ट्रिक, स्पायर सोल्युशन्स, जी४२ आणि बोईंगंचा समावेश आहे.

## थोडक्यात

### युरिया, खतांचा पुरेसा साठा निश्चित करा

**मुंबई ।** खरीप हंगामापूर्वी एप्रिल आणि मे महिन्यात युरिया आणि डीएपी (डाय-अमोनियम फॉस्फट) खतांचा पुरेसा साठा राखला जाईल याची खात्री करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. ते एका आढावा बैठकीत बोलत होते. त्यांनी कृषी विभागाला राज्यभरात खतांची उपलब्धता आणि वितरणासाठी कठोर आणि वेळेवर योजना तयार करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या तुटवड्याचा सामना करावा लागू नये याची खात्री करण्यास सांगितले.

### पंजाब भाजप कार्यालयाबाहेर स्फोट

**चंदीगड ।** पंजाब आणि हरियाणाची राजधानी असलेल्या चंदीगडमध्ये बुधवारी संध्याकाळी खळबळजनक घटना घडली. सेक्टर ३७ मधील पंजाब भारतीय जनता पार्टीच्या (भाजप) प्रदेश कार्यालयाबाहेर एका जोरदार स्फोट झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून संपूर्ण शहरात तातडीने हाय अलर्टफ जारी करण्यात आला आहे. बुधवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास भाजप कार्यालयाचे कामकाज सुरू असताना अचानक हा स्फोट झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका स्कूटीजवळ हा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की तो दूरपर्यंत ऐकू आला.

### दंड भरला, राडा झाला पण आता दोस्ती झाली !

**मुंबई ।** गेल्या वर्षी दिल्ली प्रीमियर लीगदरम्यान ज्या वादाने क्रिकेट वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली होती, तो वाद आता आयपीएल २०२६ च्या मैदानात मिटला आहे. लखनऊ सुपर जायंट्सचा फिरकीपटू दिग्वेश राठी आणि दिल्ली कॅपिटल्सचा अष्टपैलू खेळाडू नितीश राणा यांच्यातील कडू आठवणी मागे सारून दोन्ही खेळाडूंनी एकमेकांना मिठी मारली.

# मराठी भाषेसाठी राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्रदान

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**साहित्य अकादमीतर्फे २०२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या साहित्य पुरस्कारांचे आज येथे वितरण करण्यात आले. मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**



देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले होते. त्यात मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना हा सन्मान जाहीर झाला होता. नवी दिल्लीतील कमानी ऑडिटोरियममध्ये झालेल्या या समारंभात साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते श्री. बाविस्कर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष विश्वनाथ तिवारी, अकादमीच्या उपाध्यक्षा कुमुद शर्मा, संस्कृती मंत्रालयाचे संचालक अनीश राजन, अकादमीच्या सचिव पल्लवी होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे हे समाजाचे दायित्व असल्याचे सांगून विश्वनाथ तिवारी म्हणाले, की समाजातील या सृजनशील सकारात्मकतेचा गौरव झाला नाही तर समाज मूल्यहीन होऊन नष्ट होईल. त्यामुळे या सृजनाचा गौरव करणे ही अमूर्त स्वरूपातील समाजाचे प्रतिनिधी असलेल्या साहित्य अकादमीसारख्या संस्थांची जबाबदारी आहे. साहित्यिकांच्या साहित्यातून समाजाला प्रेरक मुल्ये मिळत असतात. लेखक हा सदैव जागरूक असतो. त्याचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण असते.. असे सांगितले.

# अल्पसंख्याक मंत्रालयाकडे नाही निधी

## परदेशातील संशोधक आले आर्थिक अडचणीत

वृत्तसंस्था । नागपूर

**एकीकडे जागतिक महासत्ता होण्याच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसरीकडे महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजातील उच्चशिक्षणासाठी परदेशात गेलेल्या विद्यार्थ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. परदेशी शिष्यवृत्ती मंजूर होऊनही मंत्रालयातील अल्पसंख्याक विकास विभागाने निधी नाही, असे सांगून हात झटकल्याने साता समुद्रापार गेलेल्या या विद्यार्थ्यांचे आयुष्य अक्षरशः वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे.**




अल्पसंख्याक विभागाची परदेशी शिष्यवृत्तीसाठी मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, पारशी आदी धर्मातील ७५ विद्यार्थ्यांची यासाठी निवड करण्यात येते. शैक्षणिक शुल्कासह घरभाडे भत्ताही रक्कम देण्यात येते. परंतु गेल्या अनेक महिन्यापासून घरभाडे भत्त्याची विद्यार्थ्यांना मिळाली नाही. शिष्यवृत्तीची रक्कमही दिली नाही. त्यामुळे परीक्षेला बसण्याच प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे.

पुणे समाज कल्याण आयुक्तालयाकडून सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाली. निधीसाठी अल्पसंख्याक विभागाकडे मागणी केली. परंतु अल्पसंख्याक मंत्रालयाकडून निधीच देण्यात आला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांवर मोठी गंभीर वेळ आली आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या हातात संशोधनाचे साहित्य असायला हवे होते, त्यांच्यावर आज परदेशात एक-एक पैशासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. खिशात एक रुपयाही उरलेला नाही.

**बेघर होण्याचे संकट**

घराचे भाडे थकल्यामुळे घरमालकांनी सामान बाहेक काढण्याचा इशारा (पान २ वर)

# एसटीच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डचे लोकार्पण

प्रतिनिधी । मुंबई

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्यात येत आहे. याच दिशेने** RuPay On-The-Go **एनसीएमसी सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह सर्व मंत्री व एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.**



यावेळी अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक रमेश ढावरे, तसेच सवलतधारक महिला संगीता पालकर व वर्षा कांबळे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. या कार्डच्या माध्यमातून प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल व पारदर्शक होणार आहे.

# देशातील ३२७ हवाई मार्ग बंद

## 'उड्डाण'चे अनुदान संपताच विमान कंपन्यांनी फिरवली पाठ

वृत्तसंस्था । नागपूर




**केंद्र सरकारच्या 'उड्डाण योजना'तर्गत सुरू करण्यात आलेल्या ६६३ हवाई मार्गांपैकी तब्बल ३२७ मार्गांवर विमानसेवा बंद झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अनुदानाची मुदत संपल्यानंतर विमान कंपन्यांनी पाठ फिरवल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असून, सरकारने आता सुधारित योजना लागू केली आहे.**

२०१७ मध्ये सुरू झालेल्या 'उड्डाण योजने'कडून देशातील दुर्गम व मध्यम शहरांना स्वस्त आणि सुलभ हवाई सेवा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात सरकारकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक अनुदानामुळे विमान कंपन्यांनी मोठ्या उत्साहाने या योजनेत सहभाग घेतला. अनेक नवीन मार्ग सुरू झाले आणि प्रवाशांना कमी दरात प्रवासाची सुविधा मिळाली. मात्र तीन वर्षांची अनुदानाची मुदत संपल्यानंतर परिस्थिती बदलली. कंपन्यांना स्वतःचा खर्च उचलणे कठीण जाऊ लागले आणि त्यांनी टप्प्याटप्प्याने सेवा कमी करण्यास सुरुवात केली.

**६६३ पैकी ३२७ मार्ग ठप्प**

उड्डाण योजनेंतर्गत देशभरात ६६३ नवीन हवाई मार्ग सुरू करण्यात आले होते. पण सध्या त्यापैकी ३२७ मार्गांवर विमानसेवा पूर्णपणे बंद झाली आहे. काही मार्गांवर उड्डाणांची संख्या कमी करण्यात आली आहे, तर काही ठिकाणी सेवा पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. प्रवासीसंख्या अपेक्षेपेक्षा कमी राहणे, ऑपरेशनल खर्च वाढणे आणि इंधन दरातील चढ-उतार यामुळे कंपन्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे सांगितले जाते.

# राज्यात पुढील ४ दिवस वादळी पावसासह गारपिटीची शक्यता

## जळगाव, नाशिक, धुळेसह मराठवाडा, विदर्भातील १० जिल्ह्यांत गारपीटचा इशारा

प्रतिनिधी । मुंबई

**राज्यात अवकाळी पावसाने पुन्हा जोर धरला असून पुढील पाच दिवस हवामान धोकादायक राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, नाशिक, धुळे, जळगावसह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस कोसळत आहे. या अचानक बदललेल्या हवामानामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.**



हवामान विभागाचे पुणे येथील प्रमुख सुदीप कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील पाच दिवस दुपारनंतर वादळी पावसाचा जोर कायम राहणार आहे. काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, तर काही ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता अधिक आहे.

कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे वातावरण अस्थिर झाले आहे. त्यामुळे दररोज दुपारनंतर ढगांची निर्मिती होऊन पावसाचा जोर वाढत आहे. ४ तारखेनंतर पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

दरम्यान, या पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. धाराशिव जिल्ह्यात वादळी वाऱ्यामुळे आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले असून तब्बल ५० टक्के फळे गळून पडल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून पुढील काही दिवस हवामान कसे राहील, याकडे त्यांचे लक्ष लागले आहे.

हवामान विभागाने शेतकऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. गारपीट(पान २ वर)

# व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात १९५ रुपयांची वाढ

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच व्यावसायिक आणि हॉटेल चालकांसाठी मोठा धक्का बसणारी बातमी समोर आली आहे. आज १ एप्रिल असून नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरवाढीने झाली आहे.**



आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधीच महागाई वाढली असताना आता व्यावसायिकांना सिलेंडरसाठी आणखी पैसे मोजावे लागणार आहेत. तेल कंपन्यांनी १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरच्या दरात तब्बल १९५.५० रुपयांची वाढ केली आहे.

व्यावसायिक सिलेंडरच्या वाढत्या किमतींमुळे रेस्टॉरंट मालकांचा खर्च वाढणार असून परिणामी, ते चहा, नाश्ता आणि प्लेटमधील जेवणाच्या किमती वाढवू शकतात. अशातच सध्या सुरु असलेल्या लग्नसमारंभातील केटरिंगसुद्धा महाग होऊ शकते. यावेळी (पान २ वर)

## संपादकीय

### महसूलसाठी कायद्याची चौकट !

येत्या काही दिवसांत राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदींची सखोल चौकशी सुरू करण्याचे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. जनतेचा महसूल विभागावरील विश्वास टिकवण्यासाठी सरकारने घेतलेला निर्णय योग्यच आहे. सर्वसामान्यांच्या जमिनी हडप करणाऱ्यांना कोणतीही माफी नाही, असे म्हणत जमीन फेरफार प्रकरणात सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या विषयातील सर्व पैलू जाणून घेण्यासाठी, सर्वप्रथम गेडाम समितीची स्थापना का करण्यात आली आणि समितीने केलेल्या पडताळणीच्या निष्कर्षांबाबत जाणून घेणे आवश्यक आहे. पुण्यातील जमीन अभिलेखांमधील प्रक्रियात्मक गैरवापर आणि बेकायदेशीर फेरफारांबाबतच्या तक्रारी २०२० पासून दरवर्षी वाढत चालल्या आहेत. या वाढत्या तक्रारींची दखल घेऊन महसूल विभागाने नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली सप्टेंबर २०२५ मध्ये चौकशी समिती स्थापन केली. समितीने पुणे जिल्ह्यातील गेल्या पाच वर्षांतील, प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १५५ वापरून, दिलेल्या ३८,०२७ फेरफार आणि दुरुस्तीच्या आदेशांची तपासणी केली. यापैकी केवळ २,३३७ प्रकरणांची कागदपत्रे तपासासाठी उपलब्ध होती. तपासात ४२४ प्रकरणांमध्ये गंभीर अनियमितता आणि कायदेशीर प्रक्रियांचे उल्लंघन दिसून आले. या प्रकरणांचे अ (सर्वात गंभीर), ब (मध्यम) आणि क (किरकोळ अनियमितता) अशा तीन गटांत वर्गीकरण केले गेले. समितीने एकूण १५२ महसूल अधिकार्यांना दोषी ठरवले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले की, अ गटातील १३ गंभीर प्रकरणांशी संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. या प्रकरणांतील दोषी अधिकाऱ्यांवर निलंबन आणि कायदेशीर मत घेऊन फौजदारी कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. ब आणि इतर गटातील अधिकाऱ्यांवर बदली, नॉन–एक्झिक्युटिव्ह पदांवर नियुक्ती किंवा इतर विभागीय कारवाई करण्याची शिफारस आहे. तसेच सर्व प्रकरणांची पुन्हा तपासणी करून मूळ जमिनीचे रेकॉर्ड सहा महिन्यांत पूर्ववत करण्याचे निर्देश जारी केले आहेत. या प्रकरणामुळे राज्याच्या विविध भागांत अशाच प्रकारच्या फेरफार निर्णयांची चौकशी करण्यासाठी समित्या स्थापन करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अलीकडेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम १५५, १८२, २२० आणि २५७ च्या होणाऱ्या गैरवापराबाबत विधानसभेत तसेच पत्रकारांशी बोलताना चर्चा केली. पण ही कलमे कशाशी संबंधित आहेत? महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १५५ हे जमीन महसूल अभिलेखांमधील शुद्धलेखन किंवा गणनेच्या चुकांसह कारकुनी चुका सुधारण्यासाठी आहे. तथापि, काही मोजक्या अधिकाऱ्यांकडून जमिनीची मालकी बदलणे, क्षेत्रफळ वाढवणे, जमिनीचे वर्गीकरण सुधारणे आणि अगदी बँकेचे कर्ज किंवा खटल्याच्या नोंदी काढून टाकण्यासाठी याचा गैरवापर केला गेला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे विभागांतर्गत पाच जिल्ह्यांमधील संशयास्पद जमीन महसूल निर्णयांची सखोल चौकशी करण्याचे आदेश पुणे विभागीय आयुक्तांना दिले आहेत. ही चौकशी एप्रिलमध्ये सुरू होईल. अर्ज केल्यावर लगेच निकाली काढलेली प्रकरणे, ऑनलाइन प्रणालीला बगल देऊन ऑफलाइन स्वीकारलेले अर्ज आणि नोटीस न बजावता दिलेले एकतर्फी आदेश यांवर यात लक्ष केंद्रित केले जाईल. यापैकी, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १५५, १८२, २२० आणि २५७ अंतर्गत असलेल्या २५% प्रकरणांची यादृच्छिकपणे (रँडमली) तपासणी केली जाईल. अशा चौकशा का महत्त्वाच्या आहेत? यातून जनतेला काय संदेश जातो? आंतर–जिल्हा पथकांद्वारे केलेल्या कागदपत्रांच्या पद्धतशीर ऑडिटमुळे नागरिकांना ही यंत्रणा पारदर्शक असल्याची खात्री पटते.

# अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे १७७ हेक्टर कांद्याचे नुकसान

## नंदुरबार तालुक्यातील ३४५ शेतकरी बाधित, गारपीटग्रस्त शेतीची डॉ. हीना गावितांकडून पाहणी

प्रतिनिधी । नंदुरबार





**वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नंदुरबार तालुक्यातील ३४५ शेतकऱ्यांच्या १७७ हेक्टर क्षेत्रावरील कांद्याचे तसेच १.८० हेक्टर क्षेत्रावरील मक्याचे नुकसान झाले आहे. दरम्यान, आज सलग दुसऱ्या दिवशीही तालुक्यातील पूर्वपट्ट्यात पुन्हा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नुकसान झाले आहे.**

शहरासह जिल्हयात गेल्या आठवडयात वातावरणात प्रचंड वाढ होवून तापमानाचा पारा ४० अंशावर पोहचला होता. हवामान खात्याने खान्देशात अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. त्यानुसार जिल्ह्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. काल तापमानाचा पारा ३७ अंशावर आला. काल सकाळपासून जिल्ह्यात काही भागात ढगाळ तर काही भागात कडक ऊन अशी स्थिती होती. दुपारी जिल्हयातील काही भागात प्रचंड वादळी वारा सुरु होता. ४ वाजेच्या तालुक्यातील पूर्व भागात सुमारे २५ मिनीटे गारपीट झाली. अचानक झालेल्या गारपिटीने शेतकरी, मेंढपाळ व गावकऱ्यांची धांदल उडाली. गारपीटीमुळे उन्हाळी कांदा, ज्वारी, भुईमूग, मका, टरबूज आदी पिकांना मोठा फटका बसला आहे. तालुक्यातील पूर्व भागातील शनीमांडळ, रजाळे, इंद्रिहट्टी आदी गावांमध्ये गारपीट झाली. तर बलवंड, सैताने, खर्दे खुर्द, तलवाडे, वैदांणे या भागात अवकाळी पाऊस झाला. गारपीट व पावसामुळे या परिसरात कांदा, भुईमूगसह ज्वारी, मका व टरबूज पिकाचे रुग्णालयातून आ.डॉ. गावित यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. नंदुरबार तालुक्यात काल झालेल्या अवकाळी पावसामुळे शेकडो एकर कांद्याचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभुमीवर माजी मंत्री आमदार डॉ विजयकुमार गावित यांनी रुग्णालयातूनच व्हिडिओ कॉलद्वारे नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना पंचनामासंदर्भात सूचना केल्या. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला.

शासन स्तरावर नुकसान भरपाईसाठी योग्य पाठपुरावा केला जाईल, असे सांगून डॉ. गावित यांनी याप्रसंगी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना धीर दिला. याप्रसंगी डॉ. हीना गावित यांच्यासह कृषी व महसूल विभागाचे अधिकारी तसेच भाजपा तालुकाध्यक्ष दीपक पाटील, शनिश्वर ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पाटील, माजी जि.प.सदस्य मुन्ना पाटील, शनिमांडळचे सरपंच विनायक पाटील, शांतीलाल पाटील, रमेश माळी, प्रभाकर पाटील, वसंत खैरनार, रमेश धोबी, चिंधू धनगर, जगदिश पाटिल, योगेश पवार, भटू धनगर, महेंद्र राजपूत, प्रकाश मिल, अंबर राजपूत, विवेक पाटील, सचिन पाटील, केसर राजपूत, भरत सूर्यवंशी यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, काल झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नंदुरबार तालुक्यातील ३४५ शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांचे १७७ हेक्टर क्षेत्रावरील कांद्याचे नुकसान झाले आहे. तसेच १.८० हेक्टर मक्याचे नुकसान झाले आहे. सलग दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. या शेतकऱ्यांच्या नुकसानाचे पंचनामे त्वरीत करून त्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### ➤शेतकऱ्यांना नुकसानग्रस्त निधी मिळावा

नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ, तलवाडे, इंद्रीहंडी परिसरात झालेल्या वादळी वारा आणि गारपिटीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यासोबतच मका, गह, पपई या पिकांचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी भाजपा माजी खा. डॉ. हीना गावित यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली. नुकसानीचा पंचनामा करून शासनाकडे शेतकऱ्यांना नुकसानग्रस्त निधी त्वरित मिळावा, अशी मागणी केली. या संदर्भात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## नवापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती बैठक

प्रतिनिधी । नवापूर


नवापूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची महत्त्वपूर्ण बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात माजी नगराध्यक्ष दामूआण्णा बिऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली उत्साहात पार पडली.

या बैठकीस काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सोहेल बलेसरीया, माजी नगरसेवक चंद्रकांत नगराळे, उमराण ग्रामविकास संस्थेचे सचिव दीपक वसावे, ॲड. रोशन नाईक, विजय सैन, मयुर सिंधी, प्रकाश ब्राम्हणे, ॲड.पमा सैय्यद, फरीद पठाण, दर्शन पाटील, फैजल शेख, इलीयास वालोडीया, हेमंत जाधव, जहिर औरंगाबादवाले, घनश्याम परमार, शंकर दर्जी, कमलेश मोरे, रतिलाल अहिरे, वामन अहिरे, जगदीश पाटील, मनिष पटेल, शिवसेना शहरप्रमुख अनिल वारुडे, लक्ष्मण चव्हाण, कालीदास सोलंकी, अविनाश बिऱ्हाडे, विकी बिऱ्हाडे आदी उपस्थित होते. यावेळी सर्वानुमते अध्यक्षपदी विशाल दिलीप बेडसे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण व नितेश सोलंकी, सचिवपदी ॲड. रोशन शिरीषकुमार नाईक, सहसचिवपदी मतिन शेख, कोषाध्यक्षपदी जितेंद्र अहिरे, राकेश कोकणी, कार्याध्यक्षपदी उमेश पवार, सहकार्याध्यक्षपदी अविनाश बेंद्रे, मिरवणुक प्रमुख बंटी बच्छाव सह प्रमुख गोरख नगराळे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी प्रेमेंद्र पाटील, सुनिल वाघ, चुनिलाल पवार, कमलेश पाटील, पंकज अहिरे, विजय तिजविज व जयेंद्र चव्हाण यांची निवड केली. यावेळी रामकृष्ण पाटील, लक्ष्मण चव्हाण, प्रविण तिरमली, संतोष तिरमली, किसन शिरसाठ, शैलेश सैन, संदिप चौधरी, बबलू आतारकर, ललित बिऱ्हाडे, अतुल पगारे, रविंद्र पवार, नितीन कांबळे, योगेश साळवे, संजय मोरे, तुकाराम कोकणी, विजू मावची, विकी साळवे, ॲड. राहुल शिरसाठ आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी १४ एप्रिल रोजी सकाळी ९.२५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयावर पुष्पहार अर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अविनाश बिऱ्हाडे व विकी बिऱ्हाडे यांनी दिली. सूत्रसंचलन जितेंद्र अहिरे यांनी केले.

## जळगाव मनपाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

### महापौर दीपमाला काळे यांचेकडून प्रदीर्घ सेवेचा गौरव

प्रतिनिधी । जळगाव



जळगाव महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या दोन कर्मचाऱ्यांचा महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते महापौर दालनात सन्मान करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि पंच परिवर्तनपुस्तक देऊन महापौरांनी या कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरव केला.

सत्कारमूर्ती कर्मचारी संजय वसंतराव महाजन हे १९९६ पासून (नगरपालिका काळापासून) महानगरपालिकेपर्यंत तब्बल ३० वर्षे वाहन चालक म्हणून त्यांनी सेवा बजावली. यावेळी त्यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला. विजय देवरे : नगरसचिव कार्यालयातील आपल्या प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांचे चिरंजीव, कन्या, सून आणि जावई असा सर्व परिवार उपस्थित होता. महापौर पदभार स्वीकारल्यापासून दीपमाला काळे यांनी कर्मचाऱ्यांमध्ये चैतन्यमय वातावरण निर्माण करण्यावर भर दिला आहे. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कामाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा याच प्रयत्नांचा एक भाग आहे.तुम्ही नगरपालिका ते महानगरपालिका असा सुवर्णकाळ तुम्ही स्वतः पाहिला आहात. आता महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झाला असलात, तरी आता खऱ्या अर्थाने तुमच्या स्वतःची जबाबदारी आणि आनंदाचा काळ सुरू झाला आहे. तुमची ही सेकंड इनिंग भरभरून जगा,असा सल्ला महापौर दीपमाला काळे यांनी दिला. सत्काराला उत्तर देताना दोन्ही कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. नगरपालिका ते महानगरपालिका अशा प्रवासात नागरिकांची सेवा करता आली, याचे समाधान मोठे असल्याचे त्यांनी सांगितले. महापौरांनी दाखवलेल्या या आपुलकीबद्दल त्यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रस्तावनापर निवेदन पुरुषोत्तम जोशी यांनी केले. याप्रसंगी नगरसचिव सतीश शुक्ला यांच्यासह महापालिकेचे इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरुन

**राज्यात पुढील ४ दिवस......**

आणि विजांच्या कडकडाटामुळे नुकसान होण्याची शक्यता असल्याने मोकळ्या जागेत किंवा झाडाखाली थांबू नये, असेही सांगण्यात आले आहे. तसेच पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

**व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या......**

दिल्लीतील व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे नवे दर २०७८.५० रुपये आहेत, जे आधी १८८३.०० रुपये इतके होते. त्यानुसार नवे दर आणि जुन्या दरांपेक्षा १९५.५० रुपयांनी वाढल्याचे दिसून येत आहे. तसेच मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे नवे दर २०३१.०० रुपये आहेत दिल्लीतील व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे नवे दर २०७८.५० रुपये आहेत, जे आधी १८८३.०० रुपये इतके होते, त्यानुसार नवे दर आणि जुन्या दरांपेक्षा १९५.५० रुपयांनी वाढल्याचे दिसून येत आहे. तसेच मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे नवे दर २०३१.०० रुपये आहेत.

जे आधी १८३५.०० रुपये इतके होते, त्यानुसार नवे दर आणि जुन्या दरांपेक्षा १९६ रुपयांनी वाढल्याचे दिसून येत आहे. तर कोलकातामध्ये व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे नवे दर २२०८.०० रुपये आहेत, जे आधी १९९०.०० रुपये इतके होते, त्यानुसार नवे दर आणि जुन्या दरांपेक्षा २१८ रुपयांनी वाढल्याचे दिसून येत आहे.

**अल्पसंख्याक मंत्रालयाकडे......**

दिला आहे. विद्यार्थ्यांनी कुठे आश्रय घ्यावा, असा प्रश्न त्यांच्या पुढे आहे. कित्येक दिवसांपासून हे विद्यार्थी केवळ पाणी आणि कोरड्या पावावर दिवस काढत आहेत. कित्येकांना तर आता तेथील स्थानिक दानधर्मावर अवलंबून राहण्याशिवाय किंवा अन्नछत्रांचा आधार शोधण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

विद्यापीठाचे शुल्क न भरल्यामुळे प्रवेश रद्द करण्याच्या नोटिस देण्यात येत आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्यच उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. तसे झाल्यास आतापर्यंत शासनाने त्यांच्यावर खर्च केलेले कोट्यवधी रुपये सुद्धा पाण्यात जाणार आहेत.

## निर्मल इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत!

प्रतिनिधी । पाचोरा




नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी दि.१ एप्रिल रोजी निर्मल इंटरनॅशनल स्कूलमध्ये उत्साह, आनंद आणि नव्या उमेदीनं भरलेलं वातावरण पाहायला मिळाले. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करताना एक वेगळाच आनंदोत्सव साकारला गेला.

शाळेत पाऊल टाकताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. विशेषतः पूर्व प्राथमिक विभागात रंगीबिरंगी फुग्यांनी सजवलेले आकर्षक वातावरण, चिमुकल्यांसाठी जणू आनंदाची मेजवानीच ठरली. आनंद आणि उत्साहाने शाळेचा परिसर फुलून गेला होता. सेल्फी पॉइंटने विद्यार्थ्यांसह पालकांचेही लक्ष वेधून घेतले आणि अनेकांनी या खास क्षणांची आठवण छायाचित्रांमध्ये टिपली.

या प्रसंगी शाळेच्या अध्यक्षा वैशालीताई सुर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देण्याचा प्रेरणादायी संदेश आणि नवीन शैक्षणिक वर्ष उज्ज्वल, यशस्वी आणि ज्ञानसमृद्ध जावो, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. या वेळी शाळेचे सचिव नरेंद्रसिंग सुर्यवंशी, प्राचार्य गणेश राजपूत, जनसंपर्क अधिकारी आय. बी.सिंग, उपप्राचार्य प्रदिप सोनवणे, समन्वयक स्नेहल पाटील, पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख फरीदा भारमल व वर्षा पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लोहारा शेतशिवारातील डीपी जळाल्याने शेती पिकांचे नुकसान

प्रतिनिधी । पाचोरा



पाचोरा तालुक्यातील लोहारा परिसरात गेल्या अनेक शेतातील डीपी जळाल्यामुळे दैनंदिन विजेची समस्या निर्माण झाल्याने शेती पिकांना पर्याप्त स्वरूपात पाणी दिले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पीडित शेतकऱ्यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता तथा समाजसेवक आण्णा बेलदार यांची भेट घेऊन समस्या मांडली.

त्यानंतर अण्णाभाऊ बेलदार यांनी या परिसराचे सहाय्यक अभियंता निसार सलीम तडवी यांना काही शेतशिवारातील डी.पी. जळाल्याबाबत माहिती दिली व नवीन ६३ केव्ही ट्रान्सफॉर्मर (डि.पी.) कार्यान्वित करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता उपविभाग पाचोरा ग्रामीण यांच्या कार्यालयात इस्टिमेट पाठविण्याबाबत सूचना केली. दि.१२ मार्च रोजी सहाय्यक अभियंता लोहारा कक्ष यांनी ६३ केव्ही नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत योजनेंतर्गत नवीन इस्टिमेट उपकार्यकारी अभियंता उपविभाग पाचोरा–१ यांच्याकडे पाठविण्यात आले. दि.२४ मार्च रोजी अण्णाभाऊ बेलदार यांच्या नेतृत्वात शामकांत खोडपे उपकार्यकारी अभियंता उपविभाग पाचोरा यांना शेतकऱ्यांनी निवेदन दिले. अभियंता शामकांत खोडपे यांनी चर्चेअंती कार्यकारी अभियंता सखाराम थानवी यांच्या कार्यालयात ट्रान्सफॉर्मर (डि. पी.) कार्यान्वित करण्याबाबत पाठवलेला आहे.

# अक्कलकुवा येथे भगवान महावीरांचा जन्मकल्याणक महोत्सव शोभायात्रेने वेधले लक्ष

## भगवान महावीर स्वामी की जय यासह विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजबांधवांमध्ये वाढला उत्साह

प्रतिनिधी । अक्कलकुवा





भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त अक्कलकुवा येथे विविध कार्यक्रम घेण्यात आले. सत्य, अहिंसा व ज्ञानाचा उत्सव म्हणजे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांचा जन्मकल्याणक महोत्सव. भगवान महावीर स्वामी यांनी विश्वभरात सत्य, अहिंसा, करूणाचा संदेश विश्वभरातील लोकांपर्यंत पोहचवीला. या पार्श्वभूमीवर दि. ३१ मार्च रोजी अक्कलकुवा येथे भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ६.३० वाजता श्री वासुपूज्यस्वाम २१ जिनमंदिर येथे सामूहिक पक्षाल व स्नात्र पूजनचे आयोजन करण्यात आले होते. यात दीक्षार्थी कुशल गुलेच्छा उपस्थित होते. सकाळी ८.३० वाजता ज्ञानगच्छाधिपति, श्रुतधर, पण्डितरत्न १००८ प.पू. श्री प्रकाशचंद म.सा. यांचे आज्ञानुवर्ती, प.पू.श्री कनकमुनिजी म.सा. प.पू.श्री. अजितमुनिजी म.सा., प.पू. श्री सुभाषमुनिजी मसा आदिठाणा यांनी आपल्या प्रवचनाच्या मध्यामाने भगवान महावीरांवर प्रकाश टाकला.

महावीर स्वामी यांच्या जीवन चरित्रावर तत्पश्यात सकाळी १० वाजता सजवलेल्या रथावर भगवान महावीर यांची प्रतिमा ठेवून श्री वासुपूज्यस्वामी जैन मंदिरापासून वाजत–गाजत शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी भगवान महावीर स्वामी की जय अहिंसा परमोधर्म, त्रिशला नंदन वीर की जय बोलो महावीर की या जय घोषाने अक्कलकुवा शहर दुमदुमले गेले. शोभायात्रा दरम्यान ज्ञान वाटिकाच्या बालकांनी भगवान महावीर यांना समर्पित गितावर नृत्य प्रस्तुत केले.

जैन धर्मशाला येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ६५ पेक्षा जास्त रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र तसेच खुर्ची देऊन गौरवण्यात आले. तसेच स्वामीवात्सल्यचे आयोजन करण्यात आले होते. जैन दादावाडी येथे महाप्रसादचेदेखील आयोजन लाभार्थी परिवारातर्फे करण्यात आले. दुपारी खापर येथील गौशाला येथे गौमाता व इतर पशुसाठी गुड़ व चारा देऊन जीवढ्या कार्यक्रम घेण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गावर शेतकऱ्यांचा उद्रेक

## केळीला योग्य भाव मिळण्यासाठी रास्ता रोको आंदोलन ; काही काळ वाहतूक ठप्प

प्रतिनिधी । जळगाव

**रावेर– यावल तालुक्यातील न्हावी, आमोदा, फैजपूर आणि बामणोद परिसरातील शेतकऱ्यांनी केळी भावासाठी मधुकर सहकारी साखर कारखान्याजवळ दि.१ एप्रिल रोजी दुपारी रास्ता रोको आंदोलन केले. केळी भावासाठी बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गावर शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याने या महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प होऊन विस्कळीत झाली. शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत केळीला योग्य भाव मिळावा, अशी मागणी केली.**



रावेर येथील केळी बोर्डाचा अधिकृत भाव सध्या १४०० ते १५५० रुपये प्रति क्विंटल असताना, प्रत्यक्ष बाजारात व्यापाऱ्यांकडून केवळ ५०० ते ८०० रुपयांपर्यंत भावाने केळीची खरेदी होत आहे. या मोठ्या तफावतीमुळे उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. वाढते मजुरीचे दर, सिंचनाचा खर्च, औषधे व खतांचे दर यामुळे केळी उत्पादनाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात मिळणारा भाव मात्र सातत्याने घसरत असल्याने शेतकरी संतप्त झाले. फैजपूर येथील मधुकर सहकारी साखर कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर महामार्गावर ठिय्या मारुन शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. आंदोलनादरम्यान केळीचा भाव बोर्डानुसारच मिळाला पाहिजे, व्यापाऱ्यांची मनमानी बंद करा, रावेर केळी बोर्डाचा दर लागू करा, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

काही शेतकऱ्यांनी केळीचे घड रस्त्यावर ठेवून निषेध व्यक्त केला. तसेच व्यापाऱ्यांनी ठरलेल्या भावानेच केळी खरेदी करणे बंधनकारक करावे, बऱ्हाणपूर केळी बोर्ड बंद करावा आणि खतांचे दर कमी करा, अशा प्रमुख मागण्या यावेळी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या. यावेळी आंदोलक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी घटनास्थळी येऊन चर्चा करेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा दिला. त्यामुळे प्रशासनाची धावपळ उडाली. दरम्यान, माजी आमदार शिरीष चौधरी यांनी आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांच्या मागण्यांना पाठिंबाही दर्शविला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रावेर येथे बैठकीनिमित्त उपस्थित जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

**जिल्हाधिकाऱ्यांनी साधला शेतकऱ्यांशी संवाद**

सध्या केळीच्या दरावर कायदेशीर बंधन घालण्यास मर्यादा आहेत. मध्य प्रदेशात केळी विक्री बाजार समितीमार्फत विकणे बंधनकारक असले, तरी महाराष्ट्रात शेतकऱ्यांना बांधावरून थेट विक्री करण्याची मुभा आहे. मात्र, या सवलतीचा गैरवापर होत असल्याने बाजार समितीमध्ये अपेक्षित प्रमाणात माल येत नाही. त्याचा बाजारभावावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी एकजूट राखण्याचे आवाहन करत सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बाजार समितीमार्फतच केळी विक्री करण्याचा निर्णय घेतल्यास व्यापाऱ्यांवर दबाव निर्माण होऊन योग्य दर मिळू शकतो. काही शेतकरी कमी दराने केळी विक्री करत असल्यामुळे संपूर्ण बाजारभाव घसरत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. केळी भावाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी बाजार समिती, व्यापारी आणि शेतकरी प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्याचे संकेत प्रशासनाने दिले.

## थोडक्यात

### संजय राऊत उद्या जिल्हा दौऱ्यावर

**जळगाव ।** शवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत हे तब्बल दहा महिन्यांच्या खंडानंतर ३ एप्रिल रोजी जळगाव दौऱ्यावर येत आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि जिल्ह्यातील कमकुवत झालेली संघटनात्मक रचना मजबूत करण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. जळगाव महानगरपालिकेत पक्षाची ताकद लक्षणीयरीत्या घटली असून केवळ पाच जागांवर समाधान मानावे लागले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करून पक्षाला पुन्हा बळकट करण्याचे मोठे आव्हान राऊत यांच्यासमोर असणार आहे. दौऱ्यादरम्यान ३ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता अजिंठा विश्रामगृह येथे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, संघटनात्मक अडचणी आणि आगामी निवडणुकांची रणनीती यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

### युवासेना-शिवसेनेतर्फे विनामुल्य सीईटी सराव परीक्षा

**जळगाव ।** सलग ७ व्या वर्षी राज्यात युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात व युवासेना सचिव आमदार वरूण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अकरावी, बारावी व पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सीईटी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरासह जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी युवासेना-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे ५ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेदरम्यान महावीर क्लासेस, गणेश कॉलनी, जळगाव या केंद्रावर ही मोफत सीईटी सराव परीक्षा घेण्यात येणार आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी विभागाच्या कॉमन एन्ट्रन्स टेस्ट सराव परीक्षा महावीर क्लासेस, गणेश कॉलनी, जळगाव या केंद्रावर ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे.

## जळगाव मनपाला २.४७ कोटींचा निधी; राज्य शासनाचा निर्णय

प्रतिनिधी । जळगाव

**राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभारापोटी राज्यातील महानगरपालिकांना ५०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार जळगाव महानगरपालिकेला २ कोटी ४७ लाख ९१ हजार रुपये इतका निधी मिळणार आहे.**



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार शहरातील स्थावर मालमत्तेच्या विक्री, देणगी व गहाणखत व्यवहारांवर १ टक्का दराने मुद्रांक शुल्क अधिभार आकारला जातो. या अधिभारातून जमा झालेल्या निधीतून राज्यातील २८ महानगरपालिकांना एकूण ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यास शासनाने ३० मार्च रोजी मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे हा निधी बिनशर्त स्वरूपाचा असल्याने महानगरपालिकांना स्थानिक गरजांनुसार खर्च करण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. त्यामुळे जळगाव महानगरपालिकेच्या तिजोरीत येणाऱ्या सुमारे अडीच कोटी रुपयांमुळे विकासकामांना गती मिळण्यासह प्रशासकीय खर्चाचा ताण कमी होण्याची शक्यता आहे. या निधीमुळे शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि विविध विकास प्रकल्पांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### हनुमान जयंतीनिमित्त आज महाप्रसाद


**जळगाव ।** शहरातील प्रभात चौक एम.जे. कॉलेजजवळ येथे गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी हनुमान जयंती निमित्त महाप्रसादाचे आयोजन शानबाग मंगल कार्यालय येथे सकाळी ११ ते २ वाजेदरम्यान करण्यात आले आहे. तरी सर्व भाविकांनी तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आयोजकांनी केले आहे.

## किरकोळ वादातून दोन कुटुंबांत हाणामारी

### लोखंडी पाइपने मारहाण, परस्परविरोधात गुन्हे दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील पिंप्राळा हुडको परिसरात किरकोळ कारणावरून दोन कुटुंबांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर जोरदार हाणामारीत झाले. या घटनेत दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी एकमेकांना शिवीगाळ करत लोखंडी पाइपने मारहाण केल्याने अनेकजण गंभीर जखमी झाले. ही घटना दि. २९ मार्च रोजी रात्री घडली असून दोन्ही कुटुंबांच्या तक्रारीवरून परस्परविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**



याबाबत माहिती अशी की, पिंप्राळा हुडको परिसरातील न्यू ख्वॉजानगर येथे वास्तव्यास असलेले उस्मान शहा इब्राहीम शहा यांच्या मुलीचा वाद संशयित आरिफ नादर शेख यांच्या मुलासोबत सुरू होता. रात्री सुमारे ८ वाजेच्या सुमारास हा वाद वाढला. उस्मान शहा आणि त्यांचा मुलगा वाद सोडवण्यासाठी गेले असता, आरिफ शेख, जुबेर शेख व अन्य एकाने त्यांच्यावर शिवीगाळ करत हल्ला चढवला. यावेळी लोखंडी पाइपने मारहाण करण्यात आल्याने तिघेही गंभीर जखमी झाले. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या जबाबावरून रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोहेकॉ योगेश माळी करीत आहेत. दरम्यान, दुसऱ्या कुटुंबातील जुबेर शेख हकीम (वय ३०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, उस्मान शेख हे दारूच्या नशेत त्यांच्या कुटुंबियांना शिवीगाळ करत होते. यामुळे वाद वाढून उस्मान शेख व त्यांच्या सहकाऱ्यांनी जुबेर शेख यांच्यासह त्यांच्या मामाला व जावयाला बेदम मारहाण केली. या घटनेत तेही जखमी झाले असून या प्रकरणी आरोफा शहा, शहनाद शहा, जाफर शहा आणि उस्मान शहा यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

## कचरा डेपोची रखडलेली कामे मार्गी लागणार!

### महापौर दीपमाला काळे यांचे युद्धपातळीवर काम करण्याचे अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना निर्देश

प्रतिनिधी । जळगाव

**शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या आव्हाणे शिवारातील घनकचरा डंपिंग ग्राऊंडच्या समस्यांबाबत महापौर दीपमाला काळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. या बैठकीत कचरा फॅक्टरी येथील कंपाऊंड वॉल, रॅम्प आणि रस्त्यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रशासकीय दिरंगाई आणि तांत्रिक त्रुटींमुळे रखडलेली ही कामे तात्काळ सुरू करण्याचे आदेश महापौरांनी दिले आहेत.**



शहरातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लागल्यामुळे आणि उघड्यावरील कचऱ्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत श्री श्री इन्फ्राचे मक्तेदार यांनी कामातील अडचणी मांडल्या. सुमारे ८५,००० स्क्वेअर फूट जागेवर ६ मीटरपर्यंत कचरा साचलेला असून, जमीन उंच-सखल असल्याने जोपर्यंत हा कचरा बाजूला करून जमिनीची पातळी समतल केली जात नाही, तोपर्यंत संरक्षक भिंत आणि रॅम्पचे काम करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले. शहर अभियंता योगेश बोरोले यांनी माहिती दिली की, मूळ अंदाजपत्रकात खोदकाम आणि कचरा वाहतुकीचा समावेश नाही. मात्र, निविदा रक्कम कमी असल्याने शिल्लक निधीतून वाढीव कामाचा प्रस्ताव उद्यापर्यंत तयार केला जाईल. आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी पुढील २५ दिवसांत बायोमायनिंगचे काम पूर्ण करण्याचे आणि मनपाच्या पोकलॅन्डद्वारे कामाच्या जागेवरील कचरा बाजूला करून देण्याचे निर्देश दिले. प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात काम पूर्ण करून घ्यावे, अशा सूचनाही यावेळी महापौरांनी दिल्या. या बैठकीस उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, सहाय्यक आयुक्त उदय पाटील, शहर अभियंता योगेश बोरोले यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

## धरणगावात पावणेदोन लाखांची घरफोडी

### रोकडसह सोन्या-चांदीचे दागिने लंपास

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील संजय नगर भागातील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी १ लाख ९८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना आज उघडकीस आली आहे. यात रोख रकमेसह सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा समावेश आहे.**

संजयनगर भागातील रहिवासी आणि किराणा दुकानदार लक्ष्मण हिरामण चौधरी (वय ३६) हे आपल्या कुटुंबासह राहत असून ते बाहेरगावी गेल्यानंतर घराला कुलूप लावले होते. मध्यरात्री १२:३० ते सकाळी ९ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटाचे अस्तव्यस्त करून सोन्या-चांदीचे साहित्यासह मौल्यवान वस्तू चोरून नेल्या. यात एकूण मुद्देमाल १,९८,००० रुपये चोरीस गेले असून याप्रकरणी धरणगाव पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. धरणगाव पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक संतोष पवार या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत. पोलिस अज्ञात चोरट्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, शहरात घरफोडीच्या घटनांचे सत्र सुरूच असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## पाचोरा पंचायत समितीमधील दहा जि.प.शिक्षकांचे समायोजन

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील पंचायत समिती पाचोरा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या एकूण दीडशे जिल्हा परिषद शाळा असून संचमान्यतेनुसार एक मुख्याध्यापक, एक पदवीधर, आठ उपशिक्षक अतिरिक्त ठरले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल व प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी सदर अतिरिक्त शिक्षकांचे रिक्त जागावर समायोजनाने बदली करण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली.**



सदर कामी शिक्षण विस्तार अधिकारी समाधान पाटील, सरोज गायकवाड, कार्यालय अधीक्षक अमोल पाटील, लिपिक सतीश पाटील, संजय पाटील, सुनील शिवदे, घनशाम चौधरी, सर्व केंद्र प्रमुख यांनी सहकार्य केले. यावेळी शिक्षक संघटना प्रतिनिधिंनी समायोजन प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडल्याबद्दल पंचायत समिती अधिकारी वर्गाचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. जिल्हा परिषद शिक्षकांनी पटसंख्या वाढीसाठी वाढीव प्रयत्न करण्याचे व जि.प.शाळा टिकवण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी याप्रसंगी केले.

## शेकडो वर्षाची परंपरा : यावलला आज श्री बालाजी रथोत्सव

### रथोत्सवाच्या मार्गावर डागडूजी पूर्ण ; खंडोबा महाराजांच्या बारागाड्या ओढल्या जाणार

प्रतिनिधी । यावल

**शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या श्री बालाजी रथोत्सव यावल शहरात दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी साजरा केला जाणार आहे. सायंकाळी श्री महर्षी व्यास मंदिरासमोरील हडकाई- खडकाई नदी पात्रात रथाची शास्त्रोक्त पध्दतीने मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात येईल व रथोत्सवाला सुरवात होईल. रात्रभर शहरातून रथ मार्गस्त होत शुक्रवारी सकाळी समारोप होणार आहे. दरम्यान, चोपडा रोडावरील बडगुजर समाजाच्या वतीने श्री खंडोबाची यात्रेनिमित्त बारागाड्या देखील ओढण्यात येणार आहेत.**

माजी नगराध्यक्ष चंद्रकांत देशमुख यांचे आजोबा कै. पांडूरंग धोंडू देशमुख व सहकाऱ्यांनी सन १९१४ मध्ये रथोत्सव सुरू केला होता. त्या काळात श्री बालाजी महाराजांची प्रतिमा आरूड असलेला रथ रामजी मिस्त्री विनामुल्य करून दिला होता. पुजारी म्हणून वासुदेवबाबा बियाणी, राजाभाऊ नागराज, भैय्याजी अग्नीहोत्री यानंतर १९७३ ते २००६ या काळात रमेशशास्त्री बियाणी, नारायणराव बियाणी, बलवंत जोशी व २००६ नंतर आजवर महेश बियाणी, राजु बियाणी व सुनिल जोशी पुजारी म्हणून काम पाहत आहेत. श्री बालाजी रथोत्सवानिमित्त हडकाई नदी पात्रात यात्रा देखील भरते. एकीकडे या रथाचे पूजन करून महर्षी व्यास मंदिरासमोरील नदी



पात्रातून नगरपालिकेमार्गे डांगपूरा मस्जिदीजवळ रथ दाखल होतो तर दुसरीकडे चोपडा रस्त्यावर असलेल्या राज्य विद्युत मंडळाच्या सबस्टेशनपासून ते नदीच्या शहराकडे जाणाऱ्या मार्गादरम्यान बारागाड्या ओढण्यात येतात. बडगुजर समाजाच्या वतीने या गाडया ओढल्या जातात. यात देखील मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती राहते. बारागाड्या ओढल्यानंतर रथ पुढे चावडी, मेनरोड, बोरावल गेट, देशमुख वाडा, लक्ष्मीनारायण मंदिरमार्गे, रेनुका देवीच्या मंदिराजवळ शुक्रवारी पहाटे दाखल होईल व तेथे रथोत्सवाची सांगता होईल. या रथोत्सवाच्या मार्गाचे नगर परिषदेच्या वतीने डागडूजी देखील करण्यात येत आहे. सुमारे १२ टन वजनाच्या या रथाला भाविकवर्ग ओढतो तर अतिशय शिताफीने रथाच्या चाकांना मोगरी लावतात. या रथासोबत भालदार, चोपदार मंडळीं देखील असते. शहरात सर्वत्र रथाचे पूजन व स्वागत अनेक ठिकाणी केले जाते. रात्रभर शहरात भाविकांसाठी यांत्रेची मोठी पर्वणी असते. गावात रथोत्सवानिमित्ताने डीवायएसपी अनिल बडगुजर, पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त लावला जाणार आहे.

## जलग्रामदैवत श्रीराम मंदिरात रामभक्तराज श्री हनुमान जन्मोत्सव

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव नगरीचे ग्रामदैवत श्रीराम मंदिर संस्थान येथील पूर्वीच्या जळगाव वेशीचा श्री मारुती श्री अश्वत्थ मारुती मंदिरात श्री हनुमान जन्मोत्सव गुरूवार, दि.२ एप्रिल रोजी साजरा करण्यात येणार आहे.

पहाटे ४ वा. काकडा आरती, प्रभू श्रीराम व श्री हनुमंतरायांची महापूजाभिषेक, रामभक्तराज भगवान श्री हनुमान जन्माचे भजन तसेच सकाळी सूर्योदय समयी ६.०७ मिनिटांनी श्री हनुमान जन्मोत्सव साजरा होईल. दुपारी ४ ते ६ वाजता स्वरदा नेवे समाज भजनी महिला मंडळ यांची भजन सेवा, संध्याकाळी ६.३० वाजता धुपारती, संध्याकाळी ७ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ, सामुदायिक श्रीरामरक्षा स्तोत्र पठण, श्री समर्थ रामदास स्वामी रचित श्री मारुती स्तोत्र तसेच श्री संत तुलसीदास रचित श्री हनुमान चालीसा पठण सेवा होईल. भाविकांनी सिद्ध अश्वत्थ श्री हनुमान जन्माचे दर्शन घ्यावे, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. मंगेश महाराज व विश्वस्त मंडळीनी यांनी केले आहे.

# जिल्ह्यात वादळी पावसामुळे नऊ हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान

## जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ३७३ गावांमधील १६ हजार ६३५ शेतकरी झाले बाधित

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात सोमवारी सायंकाळी झालेल्या गारपिटीसह वादळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने संबंधित सर्व शेतकरी हतबल झाले आहेत. कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, जिल्ह्यातील १३ तालुक्यांत सुमारे ९३८१.४० हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान होऊन ३७३ गावांमधील १६,६३५ शेतकरी बाधित झाल्याची नोंद घेण्यात आली आहे.**



जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारच्या अवकाळी पावसामुळे १५ पैकी १३ तालुक्यांत कमी-अधिक फरकाने बाजरी, मका, कांदा, गहू, हरभरा, ज्वारी, केळी, ऊस, पपई, मोसंबी आणि भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. भुसावळ आणि अमळनेर हे दोन तालुके तेवढे वादळी पावसाच्या तडाख्यातून वाचले आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान ३६३३ हेक्टरवरील मका पिकाचे, त्यानंतर ३१३९ हेक्टरवरील ज्वारी, १०६५ हेक्टरवरील बाजरी, ३४१ हेक्टरवरील गहू, २०९ हेक्टरवरील केळी, ३८८ हेक्टरवरील इतर फळपिके, २०८ हेक्टरवरील कांदा पिकाचे नुकसान झाल्याची प्राथमिक नोंद घेण्यात आली आहे. एरंडोल तालुक्यातील सर्वाधिक ५०१७ हेक्टरवरील पिकांना वादळी पावसाचा तडाखा बसला आहे.

**नुकसानीच्या पंचनाम्यांची प्रतीक्षा**

मार्च महिन्यातील अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेतकरी दुहेरी संकटात सापडले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने त्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. आधीच मार्चच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यातून सावरण्याआधीच पुन्हा झालेल्या पावसाने उभ्या पिकांवर घाला घातला आहे. विशेषतः गहू, हरभरा, कांदा, केळी आणि भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कापणीसाठी तयार असलेली पिके शेतातच आडवी पडल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी फळबागांनाही फटका बसला असून, शेतकरीही संकटात सापडले आहेत.

दरम्यान, या नुकसानीनंतर शेतकरी प्रशासनाकडून पंचनाम्यांची प्रतीक्षा करत आहेत. मात्र, अद्याप सर्वत्र पंचनामे सुरु झालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यास विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या संकटाच्या काळातही एकाही लोकप्रतिनिधीने थेट शेतांमध्ये जाऊन विचारपूस केलेली नाही, अशी खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

**पीक नुकसान आणि बाधित क्षेत्र**

जळगाव- १३३ हेक्टर (१६१), यावल- १११.६० हेक्टर (७३), रावेर- १०.५० हेक्टर (२३), बोदवड- ५७ हेक्टर (१९८), मुक्ताईनगर- ४०४ हेक्टर (६५८), चोपडा- १८.५० हेक्टर (३३), एरंडोल- ५०१७ हेक्टर (७२८७), धरणगाव- ३६५ हेक्टर (६७५), पारोळा- १९७५.५० हेक्टर (४६८०), पाचोरा- ७७१ हेक्टर (१२५०), जामनेर- २९७.४० हेक्टर (५५२), चाळीसगाव- ४७६ हेक्टर (१३०२), भडगाव- १४९३ हेक्टर (३२७३)

## थोडक्यात

### भुसावळ रेल्वे विभागातील २४ कर्मचाऱ्यांचा सन्मान

**भुसावळ ।** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ मंडल रेल प्रबंधक कार्यालयातील वसुंधरा सभागृहात एक औपचारिक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. दीर्घकाळ रेल्वे सेवेत कार्यरत राहिल्यानंतर दि. ३० मार्च २०२६ रोजी भुसावळ विभागातील एकूण २४ कर्मचारी सेवानिवृत्त झाले. या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रेल्वे प्रशासनामार्फत तत्काळ एकूण ८ कोटी ५७ लाख ५८ हजार १५० रुपये इतकी सेवानिवृत्ती लाभाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यात आली.

### नगराध्यक्ष भंगाळे-मंत्री महाजन भेटीने राजकीय चर्चांना उधाण

**भुसावळ ।** शहराच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष गायत्री भंगाळे यांनी आपल्या नगरसेवकांसह थेट सत्ताधारी मंत्री गिरीश महाजन यांची जामनेर येथे भेट घेतल्याने भुसावळमधील राजकीय चर्चाना नवे उधाण आले आहे. या भेटीत शहरातील विकासकामे, प्रलंबित योजना आणि निधीचा मुद्दा मांडला गेला. भुसावळसाठी विशेष निधी देण्याची मागणी देखील करण्यात आली. मात्र, या भेटीमागे फक्त विकासाचा अजेंडा आहे की राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची चाहूल आहे, हे शहरात चर्चा घेऊन फिरत आहे. राजकीय वर्तुळात यावेळी विशेष लक्ष लागले आहे. विरोधकांचे मत आहे की, नगराध्यक्ष थेट सत्ताधारी मंत्र्यांकडे गेल्याने भुसावळमधील राजकीय समीकरणांमध्ये लवकरच बदल दिसू शकतो. दुसरीकडे, समर्थकांचा दावा आहे की, ही भेट शहराच्या विकासासाठी आवश्यक होती आणि निधी मिळवण्याचा प्रयत्न आहे. विशेष तज्ज्ञांच्या मते, या भेटीमुळे शहरातील विकासकामांना गती मिळू शकते, तर राजकीय संतुलनातही हालचाल दिसण्याची शक्यता आहे. आगामी काळात या भेटीचे परिणाम भुसावळच्या राजकारणावर स्पष्ट दिसून येणार आहेत.

# मामलदे येथे दोन महिन्याच्या बालिकेचा संशयास्पद मृत्यू

## जंगली हिंस्र श्वापदाने ठार केल्याची चर्चा

प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील मामलदे शिवारातील जंगल भागात मध्यरात्री आईच्या कुशीत झोपलेल्या ध्रुवी विपुल बरवाड (वय २ महिने) या बालिकेचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. जंगली हिंस्र श्वापदाने तिला उचलून नेत ठार मारल्याची चर्चा परिसरात आहे. दरम्यान वनाधिकाऱ्यांनी कोणत्याही हिंस्र प्राणींचे आजूबाजूला पायाचे ठसे आढळून आले नसल्याचा दावा केल्याने संशयाचे जाळे निर्माण झाले आहे. एकंदरीत या घटनेमुळे संपूर्ण परिसरामध्ये



भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मामलदे शिवारातील जंगल भागातील शेतात काठेवाडी परिवार वास्तव्यास आहे. गुरे पाळणे, गाईसह वास्तव्य करत असलेल्या कुटुंबातील दोन महिन्याची बालिका रात्री खाटेवरती आईच्या कुशीत झोपलेली होती. सकाळी ती खाटेवर न दिसल्याने संपूर्ण काठेवाडी कुटुंब शेताच्या आजूबाजूला शोध घेत होता. शेतापासून काही मीटर अंतरावर गव्हाच्या कुट्टीचा ढिगाऱ्याजवळ मांस व हाडाचे तुकडे त्यांना आढळून आले. घटनास्थळी पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप, तहसीलदार भाऊसाहेब थोरात, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रसाद पाटील, पोलीस निरीक्षक मधुकर साळवे, वनक्षेत्रप ाल बी.के. थोरात,फॉरेन्सिक टीम यांनी भेट देऊन माहिती घेतली.यासंदर्भात मयत मुलीचे वडील विपुल बरवाड यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यू रजिं नंबर १६/२०२६ भा.ना. सु.स.कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली असून अधिक तपास शहर पोलिस करीत आहेत.

# विनापरवाना छोटा हत्ती गाडीत बैल कोंबून घेऊन जाणाऱ्या दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी । चोपडा

विनापरवाना बैल अवैधरित्या वाहतूक करीत असताना आढळून आल्याने दोन जणांवर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पाच लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यात बैल व वाहनाचा समावेश आहे.

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे यावल रोडकडील गेटजवळून पांढरा रंगाच्या हत्ती गाडीमध्ये विनापरवाना गोवंश जातीचे दोन बैल दाटीवाटीने कोंबून त्यांना वेदना होतील, अशा रितीने जखडून बांधून विनापरवाना वाहतूक करीत असताना जुनेद उर्फ जुबेर शेख (रा.कारगील चौक, चोपडा) व सोपान पांडुरंग धनगर आढळून आले. याप्रकरणी चोपडा शहर पोलिसात पोलीस कॉन्स्टेबल मदन रतिलाल पावरा यांच्या फिर्यादीवरून सोपान पांडुरंग धनगर (रा. टोळी बांभोरी, ता. धरणगाव)व जुबेर शेख यांच्याविरुद्ध,भाग-६ सी सीटीएनएस गुरनं १२३/२०२६ प्राण्यांना कुर्रतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ (१)डी ,इ ,एफ, के, सह मोटर वाहन कायदा कलम १५८ /१७७ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११९ प्रमाणे पुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ.संदीप भोई करीत आहे.

# चोपडा सूतगिरणी कर्मचाऱ्यांना फ्रुट ज्यूसचे वाटप

प्रतिनिधी । चोपडा

दिल्ली येथील श्री जगन्नाथ स्वामी भक्त शिरोमणी माँ कर्मादेवी संघ ट्रस्टद्वारा गिरणीतील सर्व कर्मचाऱ्यांना सूत गिरणी चेअरमन माजी आमदार कैलास गोरख पाटील यांच्या हस्ते फ्रुट ज्यूसचे वाटप करण्यात आले. यावेळी कैलासबापू यांनी ट्रस्टचे राष्ट्रीय अध्यक्ष पुरुषोत्तम राठोड व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तान्याजी राठोड यांच्या कार्याचा गौरव केला. चोपडा



तालुक्यात ट्रस्टीच्या वतीने देवकांत चौधरी, प्रा.सूर्यकांत चौधरी हे काम पार पाडत आहेत. यावेळी गिरणीतील जवळपास ३०० कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्याने वाटप करण्यात आले. यावेळी संचालक एकनाथ रामदास चौधरी, कैलास ताराचंद बाविस्कर, शशिकांत पाटील, माजी संचालक श्रीकांत नेवे, एमडी. पांडे यांच्याही हस्ते वाटप करण्यात आले. के. डी. चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# केतन पाटील यांची कालवा निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल काँग्रेसतर्फे सत्कार

प्रतिनिधी । चोपडा

चहार्डी (ता.चोपडा)येथील रहिवासी केतन सुनिल पाटील यांची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात कॅनॉल इन्स्पेक्टर (कालवा निरीक्षक)पदी निवड झाल्याबद्दल शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.संदीप पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी महात्मा गांधी शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. स्मिता पाटील, बाजार समितीचे माजी सभापती सुरेश पाटील, मधुकर बाविस्कर, प्रदीप पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजीव सोनवणे, शहराध्यक्ष नंदकिशोर सांगोरे, नगरसेविका वंदना बाविस्कर, सूतगिरणी संचालक ॲड.एस.डी.पाटील, शेतकी संघ उपाध्यक्ष बाळकृष्ण सोनवणे, माजी सभापती प्रमोद पाटील, प्रताप सोनवणे, आरिफ सिद्दिकी, सुमित पाटील, देविदास साळुंखे, किरण सोनवणे, व्ही. के. पाटील, अनिल सोनवणे, रमाकांत सोनवणे आदी उपस्थित होते.

केतन पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.ते कस्तुरबा विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एल. पाटील यांचे सुपुत्र आहेत.

# ग्रामरोजगार सहाय्यकांचे राज्यव्यापी कामबंद आंदोलन

प्रतिनिधी । पारोळा

संघटनेच्या कृती समितीच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांना राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांच्या फिक्स पेमेंट व इतर प्रलंबित मागण्यांसंदर्भात शासनाने बऱ्याच वेळेस आश्वासन देऊन सुद्धा सकारात्मक प्रतिपूर्ती केलेली नसल्यामुळे राज्याच्या ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या संयुक्त कृती समितीने १ एप्रिलपासून राज्यभर कामबंद आंदोलन करण्यात येत आहे. त्यानुसार राज्य सल्लागार तथा जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी डॉ. भूषण कदम यांना निवेदन देण्यात आले, निवेदनानुसार दि.३ ऑक्टोबर २०२४ च्या जीआरची तात्काळ अंमलबजावणी करून फिक्स मानधन थेट खात्यावर जमा करावे, ह्या प्रमुख मागणीनुसार ग्रामरोजगार



सहाय्यकांना आकृतिबंध समायोजन करून कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सवलत लागु करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या आहेत. सचिव तथा पंचायत याशिवाय, भविष्य निर्वाह, सामाजिक सुरक्षा लागू करणे, सेवेत सातत्य राखून पदोन्नतीची संधी देणे, तसेच आकस्मिक मृत्यू किंवा अपघात झाल्यास कुटुंबास गटविमा लागु करणे आदी मागण्या मान्य करणेबाबत खास शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी संघटनेच्या कृती समितीची मागणी आहे.


याबाबत तालुक्याचे गटविकास अधिकारी डॉ. भूषण कदम यांना निवेदन देण्यात आले. शासनाने संघटनेची योग्य दखल घेऊन तात्काळ मागण्या मान्य कराव्यात, असे निवेदनात म्हटले आहे. संघटनेच्या मागण्या वेळेत मान्य न केल्यास येणाऱ्या काही दिवसांनी कृती समितीच्या वतीने राज्यभर अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे. निवेदन देतांना संघटनेचे राज्य सल्लागार तथा जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे तसेच हिरालाल पाटील, नाना पाटील, संजय पाटील, मोतीलाल पाटील, प्रकाश पाटील, अनिल पाटील, दिप्तेश चौधरी, संजय पाटील, सैदाणे आदी तालुक्यातील बहुसंख्येने ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.

# न्हावीसह परिसरात अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंताग्रस्त

प्रतिनिधी । यावल

न्हावीसह परिसरात काल सायंकाळी साधारणपणे ६.३० वाजेच्या सुमारास वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटात अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेती शिवारात नुकसान झाल्याची नोंद आहे.

विजेचा लपंडाव सुरू होता. मात्र रात्री वीज सुरळीत सुरू झाली. शेतीमाल झाकण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ उडाली. न्हावी ते मधुकर सहकारी साखर कारखान्याच्या रस्त्याने दोन झाडे उन्मळून पडली. तसेच अनेक शेतकऱ्यांची केळी ही वादळी वाऱ्यामुळे भुई सपाट झाली आहे. सर्वात जास्त नुकसान निळकंठ भंगाळे यांचे झाले असून साधारणपणे साडेतीनशे



केळीचे झाड भुईसपाट झालेत. गहू व हरभरा या पिकांना वादळी वारा अडचणीचा ठरला आहे. कारण काही ठिकाणी ही पिके उभे आहेत तर काही ठिकाणी पिके कापून त्यांचा ढीग मारलेला आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

# ग्रामीण भागात मानसिक आरोग्यावर जनजागृती

## भुसावळ रेलसिटी इनरव्हील क्लबतर्फे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश

प्रतिनिधी । भुसावळ

इनरव्हील क्लब ऑफ भुसावळ रेलसिटीच्या वतीने धनाजी नाना महाविद्यालयात मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमासाठी नागपूर येथील आंतरराष्ट्रीय व कॉर्पोरेट मोटिवेशनल स्पीकर तसेच मानसिक आरोग्य तज्ज्ञ डॉ.योगिता पांडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी




विद्यार्थ्यांना मानसिक ताण, नैराश्य, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी याबाबत सविस्तर माहिती देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास सुमारे ३०० विद्यार्थी व ३० शिक्षक उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्रामीण भागात अशा प्रकारचा मानसिक आरोग्यावरील उपक्रम प्रथमच आयोजित करण्यात आला असून, यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात प्रेरणा मिळाली आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सीमा सोनार, सचिव योगीता वायकोळे, प्रकल्प अध्यक्षा डॉ.किर्ती चांदवडकर तसेच मोना भांगळे यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# देवगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह, पारायण सोहळ्याची सांगता

प्रतिनिधी । पारोळा

येथील ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने आयोजित ८ दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात करण्यात आली. काल्याच्या कीर्तनानंतर झालेल्या भव्य महाप्रसादाने या सोहळ्याची यशस्वी सांगता झाली. नामसंकीर्तनाचा गजर सप्ताहाच्या सांगतादिनी ह.भ.प. कजवाडेकर महाराज यांचे काल्याचे रसाळ कीर्तन झाले. नाम संकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्म जन्मांतरीची या उक्तीचा आधार घेत महाराजांनी कलियुगात नामस्मरणाचे महत्त्व पटवून दिले. कीर्तनानंतर दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी केलेल्या विठ्ठल नामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या मंगल प्रसंगी मतदारसंघाचे आमदार अमोल चिमणराव पाटील, सरपंच समीर पाटील, सरपंच आधार पाटील, पंचक्रोशीतील



प्रमुख मान्यवर हभप भजनी मंडळ उपस्थित राहून विठ्ठल चरणी दर्शन घेतले. यावेळी भजनी मंडळाच्या वतीने आमदार अमोल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या सप्ताहाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावातील लहान मुलांच्या भजनी मंडळाने सादर केलेली कला. खेळण्या-बागडण्याच्या वयात ही मुले वारकरी परंपरेचे संस्कार आत्मसात करत असल्याचे पाहून ह.भ.प. अनंतदासजी महाराज कजवाडेकर महाराजांनी त्यांचे विशेष कौतुक व सत्कार केला. पुढच्या पिढीसाठी संस्कारांची शिदोरी गरजेची आहे, असे मत आ.अमोल पाटील यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच, गेल्या अनेक वर्षांपासून गावात सेवा देणाऱ्या ज्येष्ठ भजनी मंडळाचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

सप्ताहाच्या सांगतादिनी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, गावातील महिला भजनी मंडळाने स्वतः पुढाकार घेऊन अत्यंत श्रद्धेने पुरणपोळीचा स्वयंपाक तयार केला होता. देवगावसह परिसरातील पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण मंडळ, ज्येष्ठ नागरिक आणि समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.